# मानवी हक्क व त्यासमोरील आव्हाने

**डॉ. उज्वला तेजराम कापगते**
कर्मवीर महाविद्यालय मुल, जि. चंद्रपूर
ujwalakapgate@gmail.com
Mob.No. – 7588772777

---

**सारांश -**

मानवी हक्काचे स्वरूप हे इतर हक्कापेक्षा वेगळे आहे. मानवाच्या स्वाभाविक प्रतीष्ठेचा व त्यांच्या गुणवत्तेचा आदर करणे हा मानवी हक्काचा आधार आहे. मानवी हक्काच्या संरक्षणाच्या दृष्टीने संयूक्त राष्ट्रसंघाने प्रकाशीत केलेला मानवी हक्काचा सार्वभौमीक जाहीरनामा हे या अनुषंगाने महŸवाचे ठरते. वैश्विकतेच्या आधारावर सर्वकाळ व सर्वप्रकारच्या परीस्थीतीमध्ये सर्वांनाच मानवी हक्काची प्राप्ती होत असते. त्यामुळे समाजातील सर्वच लोकांना समानतेच्या भावनेने जगु द्यावे हे मानवी हक्कात अपेक्षीत आहेत. मानवी हक्काची उपलब्धता ही नैसर्गिकरित्या होत असते. त्यामुळे व्यक्तीच्या जन्मापासून ते मृत्युपर्यंत हे हक्क अबाधीत असतात. मानवी हक्काच्या गरजेची व्यापकता लक्षात घेऊनच भारतीय राज्यघटनेत मानवी हक्कासंबधात अनेक तरतूदी करण्यात आल्या आहेत. त्यातच मानवी हक्काचे संरक्षण करण्याच्या व्यापक उद्देशाने मानवी हक्क संरक्षण कायदा अस्तीत्वात आला व राष्ट्रीय मानवी आयोगाची सूद्धा स्थापना करण्यात आली. असे असतानाही समाजात घडणाÚया विविध घटना व उद्भवलेली परिस्थीती यावर नजर टाकली असता मानवी हक्काचे आजमितीस मोठया प्रमाणात उल्लंघन होत असल्याचे दिसते. त्यामुळे मानवी हक्कासमोर अनेक प्रकारची आवाहने निर्माण झाल्याचा प्रत्यय आपणास मिळतो. भारतीय समाजातील हिंसाचाराची प्रकरणे निरक्षरता, दारिद्रय, बेरोजगारी, भ्रष्टाचार, दहशतवाद अशातच अधिकारी वर्गाकडुन होणारा अधिकारांचा गैरवापर यामुळे मानवी हक्काचे उल्लंघन होऊन अनेक आवाहने निर्माण झाली आहेत. त्यामुळे समाजातील बहूसंख्य घटकांना आजही आपल्या मानवी हक्कापासून वंचीत राहण्याची वेळ येते व एकूणच त्यांचे मानवी हक्क समाजात घडणाऱ्या विविध घटना घडामोडीमुळे वेळोवेळी प्रभावीत होतांना दिसतात.

**बिजशब्द -**

संयुक्त राष्ट्रसंघ, स्वाभाविक प्रतिष्ठा, व्यक्तीमत्व विकास, वैश्विकता, राज्यघटना समाजविघातक विकृती, अधिकाराचा गैरवापर.

---

**प्रस्तावना -**

प्रथम महायुध्दानंतर मानवी हक्काच्या प्रसारासाठी व वैश्विकरणासाठी जागतीक स्तरावरून प्रयत्न करण्यात आले. सन १९४५ मध्ये अमेरीकेने जपानच्या हिरोशिमा व नागासाकी या दोन शहरांवरती अणुबॉम्बने हल्ला चढविला. या अणुबॉम्बमुळे कित्येक निरपराध लोकांचा त्यात नाहक बळी गेला तर लाखोच्या संख्येने लोकांना अपंगत्वही आले. या घटनेतील मानव संहाराबरोबरच मालमत्तेची सूध्दा मोठया प्रमाणात हानी झाली. दुसÚया महायुद्धात झालेल्या या प्रचंड मानवहानीमूळे जगातील मानवतावादी तज्ञ विचारवंत राजकीय नेते व सामाजिक कार्यकर्ते यांना समान व्यासपीठावर एकत्र येऊन या घटनेची गंभीरपणे दखल घेणे भाग पडले. येथूनच यावर

आत्मपरिक्षण व व्यापक स्तरावर चर्चा करण्यास सुरूवात झाली. मानवी हक्काचा प्रश्न पुढे आल्यावर संयुक्त राष्ट्र संघानेही (युनो) १९४८ मध्ये जगाच्या मग कुठल्याही भागात असो मानवी क्रुरतेला आळा घालण्यासाठी मानवी हक्काच्या संरक्षणाच्या दृष्टिने प्रथम पाऊल टाकत मानवी हक्काचा सार्वभौमिक जाहिरनामा (Universal Declaration Of Human Rights) प्रकाशीत केला व मानवी हक्काबरोबरच मानवी प्रतिष्ठेलाही तितकेच महŸव दिले.

**मानवी हक्क -**

मानवी हक्क हे प्रत्येक व्यक्तीला मनुष्य या नात्याने जन्मतःच प्राप्त होत असते. मनुष्यत्व हाच या हक्काचा आधार असल्यामुळे व्यक्तीचा जन्म कोणत्या राष्ट्रामध्ये किवा भौगोलिक क्षेत्रामध्ये झाला आहे हा प्रश्न मानवी हक्काच्या दृष्टिने दुय्यम ठरतो. प्रत्येक मानसाला जीवन जगण्याचा, सामाजिक प्रतिष्ठेचा आणि सुरक्षिततेचा अधिकार आहे. मानवाच्या स्वाभाविक प्रतिष्ठेचा व एकूणच त्यांच्या गुणवत्तेचा आदर करणे हा मानवी हक्काचा आधार आहे. इतर हक्क हे व्यक्तीला मिळवावे लागतात. त्याकरिता राज्याविरूध्द वा राजसत्तेविरूध्द संघर्ष करावा लागतो मात्र मानवी हक्क व्यक्तीला मीळवावे लागत नाहीत वा त्याकरिता कुठल्याही सत्तेविरूद्ध संघर्ष करावा लागत नाही तर जन्मतःच व्यक्तीला त्यांची प्राप्ती होत असते. ते कोणीही देत नसतात. तर मानवी हक्काची उपलब्धता ही नैसर्गिकरित्याच होते. त्यामुळे कोणत्याही राज्याला किंवा संस्थेला हे हक्क काढून घेण्याचा अधिकार नाही व्यक्तीच्या जन्मापासून ते मृत्युपर्यंत हे हक्क अबाधीत असतात.

सामाजिक जीवनात व्यक्तीला आपल्या प्राथमिक किंवा जीवनावश्यक गरजांची पुर्तता करण्यासठी तीला काही संधी व सवलतीची अत्यावश्यकता असते. या संधी वा सवलती म्हणजेच हक्क होय. या संबधात रिचर्ड बॅसरस्ट्रॅम असे म्हणतात की, ‘‘व्यक्तीला माणूस म्हणून जगण्याकरिता आवश्यक क्षमतांचा विकास करण्यासाठी आवश्यक अधिकार म्हणजे मानवी हक्क होय.’’ तर मॅकरलोन यांनी ‘‘मानवी हक्क हे असे नैतिक अधिकार आहेत की जे प्रत्येक स्त्री आणि पुरूषाला केवळ माणूस या नात्याने प्राप्त झालेले आहेत.’’ यावरून हे स्पष्ट होते की, मानवी हक्क हे माणूस म्हणून जन्मानेच प्राप्त झालेले आहेत. व्यक्तीला सन्मानपूर्वक जगण्याकरीता व त्याच्या व्यक्तीमत्वाच्या विकासासाठी त्यांची अनिवार्यता आहे. हे हक्क उपभोगण्याकरिता विशिष्ठ सामाजिक परिस्थितीच्या निर्मितीची गरज असते. मानवी हक्कावर इतर हक्कांची मर्यादा नसते. ते स्थल - कालपरत्वे बदलत नाहीत. त्यातच सामुहिक हितासाठी सुध्दा या हक्काचे उल्लघंन करता येत नाही. हे हक्क नैसर्गिक असल्यामूळे समाज किवा राज्याकडून या हक्काची निर्मिती होत नसते तर राज्याकडून या अधिकारांना फक्त वैधानिक मान्यता प्राप्त होते.

सर्वकाळ आणि सर्वप्रकारच्या परिस्थितीमध्ये सर्वानाच मानवी हक्काची प्राप्ती होत असल्यामूळे वैश्विकता हे मानवी हक्काचे महत्वपूर्ण वैशिष्टय ठरते. या हक्कात व्यक्तीच्या स्वतंत्रपणे विचार करण्याचा निर्णय घेण्याचा आणि सन्मानपुर्वक जीवन व्यतीत करण्याचा हक्क अंतर्भूत आहे. त्यामुळे हे हक्क नाकारल्या गेल्यास मानवी मुल्यांचे अवमुल्यन होण्याची शक्यता निर्माण होते. म्हणूनच मानवी हक्काकडे न्याय, स्वांतंत्र्य आणि समता या मुल्यांचा पाया म्हणून बघितले जाते. स्वातंत्र्य आणि न्यायाचे मुल्य मानवी हक्काच्या संकल्पनेत समाविष्ठ असतांनाच समाजातील सर्वच लोकांना समानतेच्या भावनेने जगु द्यावे हे मानवी हक्कामध्ये अपेक्षीत आहे. एकूणच मानवी हक्क म्हणजे एक सामाजिक प्रक्रिया असून त्यास सामाजिक जीवन क्रमामध्ये एक विशेष जागा प्राप्त झालेली आहे व हे तेवढेच सत्य आहे. स्वातंत्र्याचा हक्क व स्वतंत्र जीवनाचा हक्क यातील निहीत भावना म्हणजे मानवी

हक्काची विस्तृत परिकल्पना होय.

मानवी हक्क व व्यक्तिविकास या गोष्टी परस्पर संबधीत आहेत. व्यक्तीला स्वतःचा विकास करून घेण्यासाठी मानवी हक्काची गरज असते. या व्यापक जाणीवेतुनच मानवी हक्काच्या संदर्भातील मूलभूत हक्क, मूलभूत कर्तव्ये तसेच मार्गदर्शक तत्वे यांचा भारताच्या राज्यघटनेत विस्तृत व सखोलपणे अंतर्भाव करण्यात आला व मानवी हक्काच्या रक्षणासंबधी प्रत्यक्ष राज्यघटनेतच तरतूद करण्यात आली. अशातच भारतीय राज्यघटना या घटनात्मक कायद्यासमवेतच मानवी हक्काच्या रक्षणासाठी भारतात वेळोवेळी अनेक कायदे सूध्दा पारित करण्यात आले. या कायद्यातील एक भाग म्हणजेच मानवी हक्क संरक्षण कायदा 1993 च्या तरतूदीनुसार मानवी हक्काचे संरक्षण करण्याची तरतूद म्हणून राष्ट्रीय पातळीवर व राज्यपातळीवर राज्य मानवी हक्क आयोगाची आणि त्यासंबधीचे खटले चालविण्यासाठी मानवी हक्क न्यायालयांची स्थापना करण्यात आली.

**मानवी हक्कापूढील आव्हाने -**

अलिकडच्या काळात शिक्षणाचा वाढता प्रसार व प्रचार माध्यमांची भूमिका, राजकीय सहभागाचे वाढते प्रमाण, सर्वसामान्य लोकांमध्ये होत असलेली राजकीय जागृती आणि त्यातच आंतरराष्ट्रीय संघटनेची मानवी हक्काप्रती सतर्कता इ. बाबीमुळे मानवी हक्कांच्या रक्षणाकडे अधिक लक्ष दिले जात असले तरी दुसरीकडे मात्र या मानवी हक्काच्या उल्लघंनाच्या घटनेतही मोठया प्रमाणात वाढ झालेली दिसते. त्यामुळे मानवी हक्कासमोर आज अनेक गंभीर आवाहने आवासून उभी आहेत. त्यांचा उहापोह हा पूढीलप्रमाणे केला आहे.

**निरक्षरता -**

प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या व्यक्तीमत्वाचा सर्वागिंण विकास साध्य करण्यासाठी हक्काची आवश्यकता असते हे सर्वश्रृत आहे. अशातच निरक्षर व्यक्तीना निरक्षरतेमुळे हक्काचे लाभ मिळत नाही. कारण अशा व्यक्तीना मुळात आपणास काही अधिकार आहेत याची जाणीव नसते. त्यामुळे असे व्यक्ती हक्काविषयी आग्रही नसतात. समाजातील सर्वसामाण्य घटकांना ज्या बाबीचा लाभ मिळत असतो तो लाभ निरक्षर व्यक्तीला त्याच्या अज्ञानतेमुळे प्राप्त होत नाही. लोकशाही अधिक यशस्वी होण्यासाठी अशा लोकशाही व्यवस्थेतील नागरीकांचे साक्षर असणे गरजेचे असजे. साक्षर नागरीक हे राजकीय दृष्टया व निरक्षर नागरीकापेक्षा अधिक जागृक असतात. त्यामुळे ते आपल्या हक्काविषयी सुध्दा आग्रही असतात. लोकशाही व्यवस्थेत मानवाधिकाराचा आदर व व्यक्तीचा कल्याण अपेक्षीत असतो.

**गरिबी -**

गरिबी आणि मानवी हक्क यांचा अगदी निकटचा सबंध आहे. सयुंक्त राष्ट्र संघाच्या मानवी हक्कविषयक जाहीरनाम्यात सर्व मानवजात जन्मताच स्वतंत्र व समान आहे. हे तत्व समाविष्ट आहे. मात्र गरीबीचे चटके बसत असलेल्या व्यक्तीच्या दृष्टीने या स्वातंत्र्याला व समानतेला काहीच अर्थ उरत नाही. जीवन जगण्याचा मौलिक हक्क उपलब्ध होत असला तरी गरिबीत जीवन जगणाऱ्या व्यक्तीसाठी या हक्काचे महत्त्व उरत नाही. विशेष म्हणजे या हक्काचा लाभ गरीब लोक घेऊ शकत नाहीत. त्यामुळे अशा व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाच्या विकासात अडसर निर्माण होणे स्वाभाविकच असते. एकूणच मानवी हक्काची तत्वे व्यक्तीच्या दृष्टीने कितीही आदर्शवत असली तरी गरीबिच्या खाईत खितपत पडलेल्या व्यक्तींना त्याचा लाभ घेणे शक्य होत नाही.

**हिंसाचार -**

साधारणपणे लोकशाही व्यवस्थेत जनतेनी आपल्या तक्रारीचे व समस्येचे निवारण सनदशीर मार्गाने करणे

अपेक्षित असते. यात आपल्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी हिंसेच्या मार्गाचा अवलंब करण्याचे काहीही कारण नसते. मात्र काही समाजविघातक विकृतीचा या घटनात्मक मार्गापेक्षा हिंसा, जाळपोळ, मोडतोड, नासधूस यावर अधिक भर असतो. त्याद्वारे हिंसाचाराच्या घटना घडतांना दिसतात. अशातच धर्म आणि जातीतील वाद व या वादाला विनाकारण जेव्हा राजकीय मुलामा देण्यात येत असतो तेव्हा सुद्धा जातीय व धार्मिक दंगलीचे वातावरण निर्माण होऊन हिंसाचाराच्या घटना घडत असतात. सामाजिक जीवनात हिंसाचाराचे वाढते प्रमाण हे देखील मानवाधीकाराच्या मार्गात मोठ्या प्रमाणात अडसर ठरते. हिंसाचारामुळे प्रचंड प्रमाणात जीवित हानी होत असतांनाच मालमत्तेचे अर्थात राष्ट्राच्या संपतीचेही अपरिमित नुकसान होते. त्यामुळे व्यक्ती, समाज, राज्य व एकूणच संपूर्ण देशातील वातावरण प्रभावित होत असते. मात्र याद्वारे देशातील नागरिकांचे मानवी हक्क सुद्धा प्रभावित होऊन या हक्काच्या मार्गात विविध अडथळयांची निर्मिती होतांना दिसते.

**बेरोजगारी -**

रोजगाराची उपलब्धता नसणे व वाढत्या बेरोजगारीचे प्रमाण हे व्यक्तीच्या मानवी हक्काची पायमल्ली होण्यास कारणीभूत ठरत असते. बेकारीचे जीवन वाट्याला आलेल्या व्यक्तीस आपल्या दैनदिन गरजांची पूर्ततादेखील चांगल्याप्रकारे करणे शक्य नसते. अशा व्यक्तींना सन्मानाचे जीवन जगता येत नाही. त्यातच आपल्या हक्काचा लाभही घेणे शक्य होत नाही. व्यक्तीच्या अंगी विविध कलागुण असणे तसेच सबंधित शैक्षणिक पात्रता असूनदेखील अशाना वाव न मिळणे वा रोजगाराची उपलब्धता न होणे म्हणजे त्यांना त्यांच्या योग्यतेपासून वंचित ठेवण्यासारखेच आहे. समाजातील असे बेरोजगार व्यक्ती हे इतरांच्या सहानुभूतीचा व प्रसंगी उपहासाचा विषय बनत असतात. त्यातच त्यांचे खच्चीकरण होते. एकूणच लोकांना मानवी हक्कापासून वंचित ठेवण्यासाठी बेकारी हा घटक मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरत असतो.

**भ्रष्टाचार -**

भ्रष्टाचार ही समाजाला लागलेली एक प्रकारची कीड आहे. भ्रष्टाचारामुळे मानवी व्यवहार हे विशेषरूपाने प्रभावित होतात. मानवी हक्काचा संकोच होण्यास समाजातील प्रशासकीय व्यवस्थेतील भ्रष्टाचार बऱ्याच प्रमाणात कारणीभूत ठरत असते. भ्रष्टाचारामुळे सामाजिक नीतिमत्ता ढासळून प्रामाणिकपणा, तत्वनिष्ठा, खरेपणा व त्यातच व्यक्तीच्या कला गुणांलाही डावलले जाते. त्यामुळे अनैतिक कृत्य वा व्यवहाराला वाव  मिळून समाजजीवनाच्या सर्वच क्षेत्रावर त्याचा विपरीत परिणाम होत असतो. भ्रष्टाचारामुळे सामाजिक नितीमत्ता ढासळू लागली आहे. भ्रष्टाचारामुळे प्रशासकीय व्यवस्था ढासळलेली आहे. त्यामुळे लाचलुचपत, दप्तरदिरंगाई, लालफितशाही इ. चे वाढते प्रमाण हे प्रशासकीय व्यवस्थेला आवाहन ठरत आहे. सर्वसामान्य माणसांचा प्रशासकीय व्यवस्थेशी नित्याचा सबंध येत असल्यामुळे या सर्व बाबीचा फटका सामान्य माणसाला बसने स्वाभाविक आहे. एकूणच सर्वसामान्य व्यक्तींनाच त्यामुळे वाईट परिणाम भोगावे लागतात.

**दहशतवाद -**

आज दहशतवाद ही संपूर्ण जगालाच भेडसावणारी व सारख्याच प्रमाणात प्रभावित करणारी गंभीर समस्या म्हणून समोर आली आहे. आज जगाच्या विविध कानाकोपऱ्यात दहशतवादी कृत्याच्या घटना घडतांना दिसतात. दहशतवादाला कोणताही जात व धर्म नसतो त्यामुळे या विघातक प्रवृत्तीतून होणारी हानी ही समाजातील व्यक्ती व संपूर्ण देशालाच भोगावी लागते. त्यामुळेच दहशतवादाचे आजमितीस गंभीर परिणाम आपल्याला दिसून येत आहेत. जागतिक दहशतवादाच्या विरुध्द संघर्ष करण्याची भाषा बोलली जाते. मात्र काही राष्ट्रे आपला स्वार्थ साधण्यासाठी

स्वताच दहशतवादी मार्गाचा अवलंब करतात. जेव्हा सामान्य माणसे दहशतीच्या वातावरणात जीवन जगत असतात. तेव्हा आपले जीवन सुरक्षित राहावे यापुरताच मर्यादित विचार करतात. त्यामुळे मानवी हक्क हे विशेष प्रभावीत होतात.

**अधिकाराचा गैरवापर -**

राज्यात कायदा व सुव्यवस्था राखणे हे सामाजिक हिताच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे कार्य समजले जाते. हे कार्य विशेष अधिकार असलेल्या यंत्रणेकडे सोपविण्यात आलेले असते. मात्र बहुतांशपणे या अधिकाराचा गैरवापर केला जातो. ज्याचा परिणाम हा सर्वसामान्याच्या जीवनावर पडत असतो. अधिकाऱ्यांना आपल्या कर्तव्याचा विसर पडून जेव्हा अधिकारशाही प्रवृत्ती वाढीस लागते. तेव्हा सर्व सामान्याचे आर्थिक व सामाजिक हित सुद्धा धोक्यात येते. त्यातून मानवी हक्काची पायमल्ली होतांना दिसते. अधिकाऱ्यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर केल्यामुळे सर्वसामान्याचे शोषण होते. त्यामुळे सबंधित वर्गाचे मानवी हक्क बाधित होऊन त्यांना विशेष स्वरुपात वाव मिळणे असंभव होते. विविध अधिकाऱ्यांच्याद्वारा आपल्या पदाचा व अधिकारांचा करण्यात येणाऱ्या गैरवापरामुळे समाजातील सबंधित घटकांना आपल्या हक्कापासून वंचित राहावे लागल्याच्या घटनेत आज वाढ होताना दिसते.

**निष्कर्ष -**

मानवाधिकार हे मानवी जीवनात अतिशय महत्वाची भूमिका बजावतात. मानवाधिकाराची गरज व आवश्यकता याची जाणीव आज सर्व मानवजातीला झाली असली आणि त्याबाबत जागृती घडवून आणण्याचे प्रयत्न जगभर सुरु असले तरी जगातील विविध भागातील बऱ्याच व्यक्तींना मानवी हक्कापासून वंचित राहावे लागले आहे ही वस्तुस्थिती आहे. २६ जानेवारी १९५० रोजी अंमलात आलेली भारतीय राज्यघटना मानवी हक्काच्या संदर्भातील केवळ भारताच्याच नव्हे तर जगाच्या दृष्टीने महत्वाचा दस्ताएवज आहे. अशातच सन १९९३ मध्ये मानवी हक्काच्या रक्षणासाठी करण्यात आलेला मानवी हक्क संरक्षण कायदा व आंतरराष्ट्रीय संघटनेची मानवी हक्काप्रती सतर्कता इ. मुळे आज मानवी हक्काकडे विशेष लक्ष देण्यात येत असले तरी विविध यंत्रणा व आर्थिक, सामाजिक व राजकीयदृष्ट्या प्रभावशाली असलेल्या व्यक्ती इ. घटकाकडून सर्वसामान्य लोकांचे मानवी हक्क पायदळी तुडविल्या जात असल्याच्या अनेक घटना घडतांना दिसतात. अशा घटना मानवी हक्कापुढे विविध प्रकारची आवाहने निर्माण करतात यावर उपाय म्हणून मानवी हक्क संरक्षणाबाबत करण्यात आलेल्या सबंधित कायद्याची सक्तीने अंमलबजावणी करण्यासोबतच व्यक्ती व सार्वजनिक जीवनात लोकशाही मूल्य रुजवून शिक्षणाच्या प्रचार व प्रसाराद्वारे जनमानसात याविषयक जागृकता वाढवितांनाच त्यांचा राजकीय सहभागही वाढविणे अगत्याचे ठरते.

**संदर्भ -**


- लोटे रा. ज. २००८, भारतातील स्थानीक स्वराज्य संस्था, पिंपळापूरे ॲड. कं. पब्लीशर्स नागपुर.
- सौ. क्षीरसागर शोभादेवी द्वारा प्रकाशीत, २०१३ समग्र मानवी हक्क, के सागर पब्लीकेशन्स पुणे.
- प्रा. बोरजेस जॉन्सन, २०११, (संपादक) संयुक्त राष्ट्र आणि इतर आंतरराष्ट्रीय संघटना, डायमंड पब्लीकेशन्स पुणे.
- डॉ. साबळे, २००४, भारतीय शासन आणि राजकारण, हिमालया पब्लिशिंग हाऊस. www.womemchild.maha.gov.in




Research Hub International Journal